सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ २२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ २२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:- पीएचआर-१५२१/प्र.क्र.९५/२०२१/जाहिरात दिनांक:-१२ जानेवारी, २०२३

# -:प्रसिध्दीपत्रक:-

विषयः- जाहिरात क्रमांक ९६/२०२२ संजीवन शास्त्रज्ञ, (Perfusionist), सामान्य राज्य सेवा, गट-ब प्रमाणपत्र सादर करण्याबाबत.

संजीवन शास्त्रज्ञ, (Perfusionist), सामान्य राज्य सेवा, गट-ब, या पदाकरीता दिनांक ०३ नोव्हेंबर २०२२ रोजी आयोगातर्फे जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती.

२. प्रस्तुत पदाच्या जाहिरातीतील परि.क्र ८.२ नुसार अनुभवाची तरतूद पुढील प्रमाणे नमूद आहेः-

Minimum fifty times experience of performing perfusions at the time of heart surgery.

३. विषयांकित पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांनी अर्जासोबत सादर केलेल्या अनुभव प्रमाणपत्राध्ये हृदय शस्त्रक्रिया करतेवेळी किती वेळा संजीवन प्रक्रिया करण्याचा अनुभव आहे, याबाबतची स्पष्टता नमूद नाही. तसेच काही उमेदवारांनी आंतरवासिता (Internship) कालावधीतील अनुभवाचे प्रमाणपत्र सादर केले आहे. आंतरवासिता हा शैक्षणिक अर्हतेचाच भाग असल्याने या कालावधीतील अनुभव ग्राह्य धरता येत नाही. त्यामुळे आंतरवासिता पुर्ण झाल्यानंतरच्या कालावधीतील अनुभव प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

४. उपरोक्त बाबी विचारात घेता अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांनी जाहिरातीमधील अनुभवाची तरतूद विचारात घेवून आयोगाच्या विहित नमुन्यात संबंधीत संस्थेच्या/कार्यालयाच्या नाममुद्रित पत्रावर (Letter Head) दिनांकासह सक्षम प्राधिकारा-याने प्रमाणित केलेले अनुभव प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. आयोगाच्या संकेतस्थळावर अनुभव प्रमाणपत्राचा विहित नमुना Downloads या सदरामध्ये उपलब्ध आहे.

५. सदर अनुभव प्रमाणपत्र सादर न केल्यास अशा उमेदवारांचा प्रस्तुत निवड प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही. अनुभव प्रमाणपत्र PDF करून विहित आकारमानामध्ये आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थाळावरील 'ONLINE FACILITIES' अंतर्गत 'Certificates Upload' या मेनूमध्ये दिनांक १९ जानेवारी,२०२३ रोजी २३;५९ वाजेपर्यंत अपलोड करणे अनिवार्य राहील.

उप सचिव, (सरळसेवा छाननी)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग